केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी सन २०१७-१८ या वर्षात आयोजित केलेल्या दिल्ली येथील अभिरुप मुलाखत कार्यक्रमासाठी आलेल्या खर्चाची रक्कम सन २०१९-२० मधील मंजूर तरतूदीतुन अदा करण्यास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२२०१९/प्र.क्र.४७/१९/मशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १७ जून, २०१९.

वाचा : १) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.प्रीआय-५४१८/प्र.क्र.३०/मशि-२, दिनांक ०२.०२.२०१८.
२) उच्च शिक्षण संचालनालयाचे क्र. उशिसं-२०१९/८९/प्रशासकीय मान्यता/प्रशा-३/२५८१, दिनांक २५.०२.२०१८

प्रस्तावना :

सन २०१७-१८ या वर्षामध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मार्गदर्शन प्राप्त व्हावे याकरीता महाराष्ट्र सदन, दिल्ली येथे अभिरुप मुलाखत कार्यक्रम राबविण्यास संदर्भीय क्र. १) अन्वये मान्यता देण्यात आली होती. सदर अभिरुप मुलाखत कार्यक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी वर्गास अनुज्ञेय दराने भत्ते, तज्ञ मार्गदर्शकांचे मानधन व भत्ते तसेच मुलाखतीचे व्हिडीओ शुटींग, आवश्यक साधन सामुग्री व अन्य बाबींवर झालेला खर्चाची रक्कम सन २०१९-२० मध्ये मंजूर तरतुदीतून अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१७-१८ या वर्षात केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी दिल्ली येथे आयोजित केलेल्या अभिरुप मुलाखत कार्यक्रम राबविण्यासाठी आलेला रु. ३,३८,३४६/- (रुपये तीन लक्ष अडतीस हजार तीनशे शेहेचाळीस फक्त) इतका खर्च सन २०१९-२० मधील मंजूर तरतूदीतुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. या बाबींवर होणारा खर्च “मागणी क्र.डब्ल्यू-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण ००३ प्रशिक्षण (०२) प्रशिक्षण (०२)(०३) शासकीय महाविद्यालयात भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र उघडणे (अनिवार्य) (२२०२ एच१०८) २८- व्यावसायीक सेवा” या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० मध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ मधील अटी व शर्तीनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग एक मधील अ.क्र.६ नियम ४० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील तसेच इतर संबंधित शासन निर्णयामधील तरतुदींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१७१७१५३४१३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Hemantkumar
Pandharinath Baviskar

Digitally signed by Hemantkumar Pandharinath Baviskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=71de9bdf8c28541d92a5cd36d722315bab7f006ec5420633722d42e0976d82a8, serialNumber=284a4236ae7795d36dd2ecb5ac6ca70c333a3cf1b13f66828d224ae2026b37e9, cn=Hemantkumar Pandharinath Baviskar
Date: 2019.06.17 17:20:21 +05'30'

(हे.पं. बाविस्कर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. महालेखापाल लेखा वअनुज्ञेयता,महाराष्ट्र १/२ , मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल लेखापरीक्षा,महाराष्ट्र १/२ , मुंबई/नागपूर.
४. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर.
५. संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
६. संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई.
७. कार्यासन (साशि-१/मशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. निवड नस्ती,कार्यासन मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.